# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापुर

डॉ. एस. सी. नागपुरे
मुख्य बिजोत्पादन अधिकारी
**Ph D MBA, IEABM (Israel)**

**ई – मेल:** **cspocdfwr@gmail.com**
म.प्रा.प्र. वणी रंभापुर – ४४४१०२
ता. जि. अकाला (महाराष्ट्र)


---

जा.क्र./म.प्रा.प्र./ ता./२०२६/ 683

दि. 29 /०८/२०२६

**प्रती**

**प्रभारी अधिकारी**
**कृषी माहिती व प्रणाली यंत्रणा कक्ष**
**डॉ.पंदेकृवि अकोला.**

**विषय**:- म. प्रा. प्र. कार्यालय अंतर्गत विभागातील प्रक्षेत्रा सन २०२६-२७ या खरीप हंगामातील मध्ये पेरणी पश्चात करावयाच्या कामास कंत्राटी पद्धतीने करण्याकरिता परवानाधारक कंत्राटदार यांचे कडून निविदा दर पुरवणे करिता निविदा सुचनास विद्यापीठ संकेत स्थळावर व्यापक प्रसिद्धी देणे बाबत...

महोदय,

वरील नुसार, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापूर कार्यालय अंतर्गत खरीप २०२६-२७ या खरीप हंगामातील मध्ये पेरणी पश्चात मजुरांकडून करावयाच्या कामास कंत्राटदाराकडून दर मागविणे प्रस्तावित आहे.

त्या अनुषंगाने निविदा सूचना तयार केलेली असून निविदा सूचनास विद्यापीठ संकेत स्थळावर व्यापक प्रसिद्धी देण्याचे करावे हि विनंती. करिता माहितीस व योग्य कार्यवाहीस.

**सोबत:** निविदा सूचना

31/8/26

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
**म प्रा प्र, वणी रंभापूर**

**प्रतिलिपी:** ग्रामपंचायत कार्यालय अन्वी/मिर्झापुर/वणी रंभापुर(राजापूर)/पैलपाडा/तानखेड/कोठारी/ढगा/निपाना/काटेपुर्णा/बोरगाव मंजू यांना विनंती आहे की गावात माहिती होणे करिता आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डवर तसेच दवंडी देऊन व्यापक प्रसिद्धी देण्याचे करावे..

# मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर

## निविदा सूचना

मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर अंतर्गत प्रक्षेत्रावरील, विभागातील प्रक्षेत्रा सन २०२६-२७ या खरीप हंगाम मध्ये पेरणी पश्चात व इतर कामे करण्याकरिता कंत्राटी पद्धतीने योग्य त्या परवानाधारक कंत्राटदार यांचे कडून खालील नमूद कामाचे विवरण संदर्भाने निविदा दर मागविण्यात येत आहे.

**२०२६-२७ या खरीप हंगाम मध्ये पेरणी पश्चात मजुरांकडून व इतर कामे कंत्राटदाराकडून करण्याकरिता मागविलेल्या कामाबाबत दाराचे विवरण**

| अक्र | कामाचे विवरण | कामाचा प्रकार | दर रु. प्रति हेक्टर |
|---|---|---|---|
| १ | कांदा लागवड व इतर | अ) कांद्याची रोपे काढणे, वाहतूक करणे व रोपे लागवड करणे | दर रु. प्रति हेक्टर |
| | | ब) कांदा काढणे, जमा करणे (Bulb काढणे) | दर रु. प्रति हेक्टर |
| | | क) कांदा कापणे व कांदा लावणे (Bulb लावणे) | दर रु. प्रति हेक्टर |
| | | ड) बियाणे कांदा कापणे व जमा करणे | दर रु. प्रति हेक्टर |
| २ | यंत्राने कांदा रोप लावणे | यंत्राने कांद्याची रोपे लावणे, वाहतूकसह | दर रु. प्रति हेक्टर |
| ३ | पिकातील अडान काढणे | सोयाबीन/उडीद/मुग/तूर/भुईमुग | दर रु. प्रति हेक्टर |
| ४ | पिक कापणी करणे (कापणी करणे, गंजी लावणे ताडपत्रीसह) | सोयाबीन | दर रु. प्रति हेक्टर |
| | | उडीद | दर रु. प्रति हेक्टर |
| | | तीळ | दर रु. प्रति हेक्टर |
| | शेगा तोडणे | मुग | दर रु. प्रति हेक्टर |
| | | उडीद | दर रु. प्रति हेक्टर |
| | | भुईमुग (उपटणे व तोडणे) | दर रु. प्रति हेक्टर |
| ६ | पिकांची मळणी करणे (मळणी यंत्र/हडंबा मजुरासह) | सोयाबीन (अंबा/एकविरा/जे. एस.२४-३३/२२-१६) | दर रु. प्रति क्विंटल |
| | | सोयाबीन (सुवर्ण सोया) | दर रु. प्रति क्विंटल |
| | | मुग | दर रु. प्रति क्विंटल |
| | | उडीद | दर रु. प्रति क्विंटल |
| ७ | बियाणे प्रक्रिया करणे (Seed Processing Plant) | बियाणे आणणे, प्रक्रिया करणे व बियाणे थप्पी लावणे मजुरासह | दर रु. प्रति क्विंटल |
| ८ | पोत्याची थप्पी लावणे | ३० किलो | दर रु. प्रति ३० किलो |
| | | ५० किलो | दर रु. प्रति ५० किलो |
| ९ | बियाणे लोडिंग अनलोडिंग करणे (मजूर, वाहना व सर्व कारसह) विभाग/भांडार/कृषिउत्पन्न बाजार समिती /इतर ठिकाणी | (४० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति कि मी |
| | | (५० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति कि मी |
| | | (४० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति ५ कि मी |
| | | (५० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति ५ कि मी |
| | | (४० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति १० कि मी |
| | | (५० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति १० कि मी |
| | | (४० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति १५ कि मी |
| | | (५० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति १५ कि मी |
| | | (४० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति २० कि मी |
| | | (५० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति २० कि मी |
| | | (४० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति २५ कि मी |
| | | (५० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति २५ कि मी |
| | | (१०० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति कि मी |
| | | (१२० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति कि मी |
| | | (१०० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति ३० कि मी |
| | | (१२० क्विंटल बियाणे) | दर रु. प्रति ३० कि मी |
| १० | पिकांना पाणी देणे (कांदा/सोयाबिन/मुग/उडीद/हरबरा/ज्वारी/करडी/जवस/मोहरी) | अ)मोटर/इंजिन, स्प्रिंकलर संच, तीस पाईप, १० नोझल व मजुरासह | दर रु. प्रति हेक्टर |
| | | ब) कार्यालयाचे स्प्रिंकलर संच व बाहेरील मजुरासह | दर रु. प्रति हेक्टर |

| ११ | अकुशल व कुशल मजूर पुरविणे | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | विवरण | अकुशल मजूर/ पिक राखंदार | | कुशल मजूर /कृषि यंत्रे, अवजारे व इतर यंत्रे | |
| | | रु. प्रति दिवस | रु. प्रति महिना | रु. प्रति दिवस | रु. प्रति महिना |
| अ | संस्थात्मक शेतीकरिता किमान वेतन | १८०/- | ४६८०/- | २४०/- | ६२४०/- |
| ब | सुधारित विशेष भत्ता | १६४.८४/- | ४२८६/- | १६४.८४/- | ४२८६/- |
| | एकुण किमान वेतन | ३४४.८४/- | ८९६६/- | ४०४.८४/- | १०५२६/- |
| क | राज्य कामगार विमा नियमाप्रमाणे (कामगार योगदान ३.२५ %) | ११.२०/- | २९१.३९/- | १३.१५/- | ३४२.०९/- |
| ड | कामगार भविष्य निर्वाह निधी (कामगार योगदान १३ %) | ४४.८२/- | ११६५.५८/- | ५२.६२/- | १३६८.३८/- |
| | एकुण (अ+ब+क+ड) | ४००.८६/- | १०४२२.९७/- | ४७०.६१/- | १२२३६.४७/- |
| इ | सेवा कर | | | | |
| ई | एकुण ((अ+ब+क+ड+इ) दर टाकावे | | | | |

**उपरोक्त कामाचे दर दिनांक ०७/०८/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावे.** कामाचे अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

## अटी व शर्ती

१. निविदा सादर करतांना निविदा पाकिटावर सन २०२६-२७ या खरीप हंगामातील मध्ये पेरणी पश्चात व इतर कामे करण्याबाबत असा स्पठ उल्लेख असावा.

२. निविदा सादर करतांना कंत्राटदाराकडे संबधित कामाचा वैध परवाना (कामगार आयुक्त) असणे बंधनकारक आहे. तसेच वैध परवाना सोबत संबधीत GST, PF, PT, ESIC, Shop Act, Adhar Udhyam, MLWB हे दस्तावेज व इतर सर्व आवश्यक कागदपत्रे निविदा सोबत सादर करणे बंधनकारक राहील.

३. निविदामाधीम संबंधित कामे कात्रांट पद्धतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदाधारकाची राहील. करा सबंधी कोणतीही तक्रार असल्यास हे कार्यालय/विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

४. कंत्राट पद्धतीने प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम, बीजप्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

५. मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वाणी रंभापूर अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम संबंधित कामे करीत असतांना यंत्राचे/वाहनाचे/नवीन/सुट्टया भागाचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषा/दाराप्रमाणे नुकसान भरपाई संबधित कंत्राट दाराकडून वसूल करण्यात येईल.

६. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कार्यक्रम कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबंधित कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी सबंधित कंत्राटदाराची राहील.

७. विभागावर देण्यात आलेले बिजोत्पादन कार्यक्रम कामे तसेच बीजप्रकिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग सबंधित तांत्रिक कामे पूर्ण करण्यात यावे. कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

८. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या नियमांचे पालन करणे संबधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील. तसेच कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी.-+.अन्यथा देयक अदा केले जाणार नाही

९. या कार्यालया तर्फे कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यकम, संशोधन प्रयोग सबंधित कामे करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही. सबंधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी सबंधित कंत्राटदाराची राहील.

१०. कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत केल्यावर तसेच संबधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल .

११. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कार्यक्रम कामे तसेच बीजप्रकिया केंद्र, व वाहन विभाग सबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांना, कामगार ( Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, क्याशलेस पद्धतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे करांचा नियमाने व नियमित भरणा करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी सबंधित कंत्राटदाराची राहील.

१२. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कार्यक्रम कामे तसेच बीजप्रकिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग, व इतर विभाग संबधित कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/मा. मुख्य बिजोत्पादन अधिकारी यांचे समक्ष मिटविला जाईलव अंतिम निर्णय मुख्य बिजोत्पादन अधिकारी, वणी रंभापुर यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील. .

१३. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कार्यक्रम कामे तसेच बीजप्रकिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग, व इतर विभाग संबधित तांत्रिक कामे खरीप या हंगामा करिता असून कामाचे दर ई-निविदा दर लागू होतील त्या दिनांकाचे आधील दिवसापर्यंतच वैध राहतील.

१४. बिजोत्पादन कार्यक्रम कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र व वाहन विभाग संबधित तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षापेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दृष्ट्या सक्षम असावेत.

१५. तांत्रिक कामे करण्यासठी पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्याकडे संबधित तांत्रिक कामाची पदविका/आयटीआय प्रमाणपत्र/ वाहन चालविण्याचा परवाना व कामचा अनुभव असणे बंधनकारक राहील.

१६. ज्या विभागावर काम उपलब्ध असेल त्याच विभागावर काम करावे लागेल. तसेच निविदा प्रक्रियेतील पात्र कंत्राटदार संस्था निविदा मधील कामे करण्यास नकार देत असतील तर पुन्हा निविदा प्रक्रिया न राबविता नव्या कंत्राटदार संस्थे मार्फत दस्तावेजाची पूर्तता असणारयांना कामे देण्यात येईल

१७. विभागावर देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे. अर्धवट काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

१८. यंत्राद्वारे कामे करत असतांना कोणत्याही प्रकारचे नुकसान जीवितहानी व अपघातास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत कंत्राटदाराची राहील. तसेच यंत्राद्वारे कामे करत असतांना विद्यापीठाच्या मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी घ्यावी. होणाऱ्या नुकसानीस सर्वस्वी कंत्राटदारास जबाबदार धरण्यात येईल व नुकसान भरपाईची वसुली करून घेण्यात येईल.

१९. कार्यलयीन पद्धती प्रमाणे समाधानकारक कामाचे देयक अकोला कार्यालयाकडून मंजूर झाल्यावरच आपल्याला कामचा मोबदला/ देयक खर्च दिले जाईल त्यामुळे वरवर विचारणा करू नये.

२०. सदर कामे कार्यालयीन दैनंदिन स्वरुपाची असतील व शासकीय नियमाप्रमाणे प्रतीदिन आठ तासाचे काम असेल. तसेच एखादया कंत्राटी मजुरास कुठल्याही दिवशी कामावर हजर राहणे शक्य नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तीची व्यवस्था लावण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची असेल.

२१. सदर कामे हि पुर्णता बह्यस्त्रोता मार्फत कंत्राटी पद्धतीने करावयाची असल्याकारणाने मजुराच्या जेष्टता यादीत कामाची अथवा कामावरच्या हजेरीची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही .

२२. कोणत्याही कंत्राटी कामगारास कामावर ठेवणे व काढून टाकणे याबाबत संपूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीत अधिकार्याकडे असतील.

**२३. कामावरील कंत्राटी कामगारास अपघात विमा, महागाई भत्ता, भविष्य निर्वाह निधी व वेळोवेळी शासन निर्णयानुसार कंत्राटी मजुराचे देय लाभ उपलब्ध करून देण्याची संपुर्ण जबाबदारी सेवा पुरविणारा कंत्राटदार/संस्था यांची राहील. (निविदा सुचानमधील अ.क्र. ११ नुसार)**

**२४. निविदा सुचानमधील अ.क्र. ११ (इ) नुसार सेवाकर या सदराखाली कंत्राटदार यांनी आपली रक्कम देण्यात यावी व एकूण अ.क्र. ११ (ई) (अ+ब+क+ड+इ) नुसार दर सादर करण्यात यावे.**

२५. सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदारास बाल मजूर कायद्याचे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच कंत्राटदाराने नेमलेल्या कामगाराचा पगार,रजा, ग्रॅज्युएटी,बोनस,विमा, योजना,पि.एफ, ई.एस.आय.सी. इत्यादी देय बाबी तसेच वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय/वेतन देण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदारांची राहील याबाबतील काही तंटा निर्माण झाल्यास कार्यालय हस्तक्षेप करणार नाहीत व कोणतीही या कार्यालयाचा अधिकारी अथवा विद्यापीठाची जबाबदार राहणार नाही.

२६. कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख उदा. हजेरी नोंद,वेतन वाटप नोंद, दैनंदिन कामाच्या नोंदी इत्यादी नोंद वह्या ठेवणे व ते सबंधित प्राधिकरणाद्वारे तपासून घेणे बंधनकारक असून, त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार/पुरवठादाराची राहील.

२७. कामगारच्या वैयक्तिक खात्यावर पि.एफ.विमा व इतर भरणा केलेले चलन/पावती प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात देयक सादर करतेवेळी सादर करणे बंधनकारक राहील. तसेच प्रत्येक कामगारास साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक राहील याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२८. शासकीय कामगार कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट मधील नमुन्याप्रमाणे मजुरास ओळखपत्र देणे कंत्राटदारास बंधनकारक असून कामाच्या दिवशी सदरील ओळखपत्र कामगाराकडे असणे गरजेचे आहे.

२९. कंत्राटी मजुरास काम करतेवेळी इजा, अपघात अथवा मृत्यू संभाविल्यास किवा नैसर्गिक आपत्ती उदा प्राणी आणि वाढळामुळे इजा मशिनर ,पाऊस भूकंप ,विज . अपघात अथवा मृत्यू संभविल्यास त्याची सर्व भरपाई आणि इतर कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील याचा या कार्यालयाशी अथवा विद्यापीठाशी कुठल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

३०. कंत्राट पद्धतीने मजूर पुरवठा करण्याचे काम सब कॉन्ट्रॅक्ट/कंपनी किंवा इतर व्यक्तींना देता येणार नाही तसे केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांचा करार रद्द करण्यात येईल आणि त्यानंतर कार्यालयाचा तसेच विद्यापीठच्या कोणत्याही प्रकियेत संबंधित कंत्राटदारास भाग घेता येणार नाही.

३१. कार्यालयाकडून विलंबाने देयक जमा झाले तरी प्रत्येक वेतन पुढील पाच तारखेपर्यंत वेतन संबंधीत मजुरांना अदा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील किमान वेतन कायद्यानुसार अदा केल्याची माहिती ई.सी.आय.एस., पी एफ कामगार कल्याण निधी यांची कामगारांना व त्याचे योग्य त्या शासकीय खात्याला जमा केल्याची नोंद व चलान प्रत्येक महिन्यात देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

३२. सर्व प्रक्षेत्रावरील कामे एकाच वेळेस येणे अपेक्षित असल्याने प्रक्षेत्रावरील कामे वेळेत होण्याच्या दृष्टीने मंजूर झालेल्या निविदा दर पत्रकातील सर्वात कमी दरा नुसार कामे एका पेक्षा जास्त कंत्राटदारास वाटून देण्याचे अधिकार काम करून घेणाऱ्या संबंधित अधिकारी यांना राहतील. व दिलेली कामे विहित मुदतीत करून देणे बंधनकारक राहील. तसेच सदर काम करण्यास पात्र कंत्राटदार यांनी नकार दिल्यास सर्व पात्र कंत्राटदार यांनी ना-हरकत पत्र दिल्यावर तेच मंजूर दरानुसार काम करण्यास इतर नवीन कंत्राटदारास फक्त कार्यालयीन प्रक्रिया करून पात्र/अपात्र ठरविल्यानंतर नवीन कंत्राटदार यांना मंजूर झालेल्या दरानुसार सदर कामे देण्यात येतील.

३३. कंत्राटदार यांनी विभागावर काम करिता असतांना वस्तु व सेवा कर (GST) २ % व आयकर टीडीएस २ % हे देयक रक्कमेवर कपात करण्यात येईल व संबंधित कंत्राटदारास सदर कर कपातीचा त्रैमासिक परतावा दाखल (quarterly return) करून सदर कराचा परतावा मिळवता येईल.

३४. कामाचा आदेश मिळालेल्या कंत्राटदारास प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष काम सुरु असतांना काम सुरळीत चालण्याचे दृष्टीने कंत्राटदार स्वत; अथवा पूर्णवेळ पर्यवेक्षक नेमून कामाचा सतत पाठपुरावा व देखरेख करणे बंधनकारक राहील. हे कार्यालय किंवा संबंधित विभागाचे कर्मचारी त्यामध्ये गुंतून राहणार नाही तर सुरळीत व वेळेत काम पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी हि कंत्राटदाराची राहील.

३५. निविधा द्वारे कामाचे दर सादर करीत असतांना GST/ सर्व करासह सादर करावे. तसेच सन २०२५-२६ मध्ये ज्या कंत्राटदारांनी मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापुर व मध्यवर्ती संशोधन केन्द्र, डॉ. पंदेकृवी, अकोला अंतर्गत कर्मशाळा विभागाचे यंत्र वापरली असल्यास यंत्राचे आकारणी दाराचे भुगतान केले बाबतचे न-हरकत प्रमाणपत्र (NOC) निविदा भरतांना सोबत जोडणे बंधनकारक आहे. तसेच ज्या कंत्राटदाराच्या नावाने नुकसान भरपाई बाबत कार्यवाही असल्यास नुकसान भरपाई भरल्याचे प्रमाणपत्र निविदा सोबत जोडणे बंधनकारक राहील. ना-हरकत प्रमाणपत्र न जोडल्यास सदर कंत्राटदार यांची निविदा रद्द केल्या जाईल.

३६. कामावर ठेवलेल्या मजुरांना हजेरी पत्रक कामाच्या प्रत्येक ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे संबंधीत कार्यालय प्रमुखा केव्हाही हजेरीप्रत्रक तपासण्याचा अधिकार राहील. कंत्राटदाराकडून वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास अथवा कंत्राट मजुरांचे काम समाधानकारक नसल्याचे आठळून आल्यास सदरचा कंत्राट कामाचा आदेश तातडीने रद्द करण्यात येईल. या प्रक्रियेबाबत कुठलेही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास अधिकार क्षेत्र अकोला जिल्हा न्यायालय राहील

३७. निविदा प्रक्रियेतील वरील नमूद सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असल्याचे रु ५०० चे स्टंप पेपर वर करारनामा करून निविदा सादर करतेवेळी निविदासोबत जोडणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. निविदासोबत सादर न केल्यास कंत्राटदार यांना अपात्र करण्यात येईल.

21/8/25

मुख्य बिजोत्पादन अधिकारी

मा.प्रा.प्र. वणी रंभापुर

**प्रतिलिपी:** ग्रामपंचायत कार्यालय अन्वी/मिर्झापुर/वणी रंभापुर(राजापूर)/पैलपाडा/तानखेड/कोठारी/ढगा/निपाना/काटेपुर्णा/बोरगाव मंजू यांना विनंती आहे की गावात माहिती होणे करिता आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डवर तसेच दवंडी देऊन व्यापक प्रसिद्धी देण्याचे करावे..